# प्रेसनोट

दि. ३०/०४/२०२४

महावितरण कार्यालय, भोसरी गांव, पिंपरी-चिंचवड येथील सहायक अभियंतावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | किरण गजेंद्र मोरे, वय ३३ वर्ष, पद - सहायक अभियंता (वर्ग-२) महावितरण कार्यालय, शाखा - भोसरी गांव, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४५,०००/- रुपये (पंचेचाळीस हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ३०/०४/२०२४ |
| सापळा दिनांक | ३०/०४/२०२४ |

ठिकाण :- भोसरी गांव महावितरण कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे.

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार हे फ्रेंड इलेक्ट्रानिक्स कंपनी, पुणे चे सर्व कामकाज पाहतात. नमुद कंपनीला सन राईस कंपनीचे विद्युत भार वाढविण्याचे काम मिळाले होते. सदरचा विद्युत भार वाढविण्यासाठी तक्रारदार यांनी महावितरण कार्यालयास अर्ज केला होता. सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी लोकसेवक किरण मोरे यांचेकडे होता. लोकसेवक किरण मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे सदरचे काम करुन देण्यासाठी ५०,०००/- रुपये लालचे मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक किरण मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष विद्युत भार वाढविण्यासाठी तडजोडीअंती ४५,०००/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी करुन, लोकसेवक किरण मोरे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ४५,०००/- (पंचेचाळीस हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.